# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०१५
## (दुपारी १२.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे :-

**वित्त मंत्री** : "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०१४-२०१५ हे प्रकाशन" सभागृहासमोर ठेवतील.

तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.

(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.

चार : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

पाच : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला व शेवटचा दिवस).

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल -

(१) मुख्यमंत्री.

(२) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री.

(३) वित्त आणि नियोजन, वने मंत्री.

(४) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री.

(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.

(६) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल विकास मंत्री.

(७) आदिवासी विकास मंत्री.

(८) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री.

(९) जलसंपदा मंत्री.

(१०) उद्योग मंत्री.

(११) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री.

(१२) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री.

(१३) **सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री.**

(१४) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.**

# - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके -**

(क) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१५.

---

(ख) **विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०१५.

---

**सात : (क) सर्वश्री.रामनाथ मोते,** पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अनिल सोले, ॲड.अनिल परब, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"शालेय शिक्षण विभागावर विद्यार्थ्यांना शिकवून नवीन पिढी घडविण्याची महत्त्वाची जबाबदारी असणे, ही जबाबदारी पार पाडण्यासाठी शासनाकडून गत चार महिन्यात सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणे, याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून दप्तराचे ओझे कमी करण्याचा निर्णय घेण्यात येणे, सदर निर्णयाची त्वरेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, परिसरातील शाळांना मार्गदर्शक ठरतील अशा आदर्श शाळा निर्माण करण्यासाठी आमदार दत्तक शाळा योजना प्रभाविपणे राबविण्याची आवश्यकता असणे, चांगल्या शाळांना प्रोत्साहन मिळावे व बोगस पटसंख्या दाखविणाऱ्या शाळांना आळा बसावा याकरिता सर्व शाळांमध्ये बायोमेट्रीकचा वापर बंधनकारक करण्याची आवश्यकता असणे, आधुनिक काळास अनुसरून महाराष्ट्रामध्ये प्रत्येक तालुक्यात डिजिटल शाळांची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता, दरवर्षी फेब्रुवारी अखेरपर्यंत संच मान्यतेचा निर्णय न झाल्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झाल्यामुळे संच मान्यतेचे काम दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याची आवश्यकता असणे, शाळाबाह्य मुलांच्या प्रत्यक्ष गणनेसाठी एक विशेष जनगणना मोहिम राबविण्याची आवश्यकता असणे, तसेच विद्यार्थ्यांचे संपूर्ण पोषण होण्यासाठी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत वैविध्यपूर्ण आहार मिळणे गरजेचे असणे, प्रयोगशील शिक्षकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी विविध उपक्रम राबविणे गरजेचे असणे, शाळेपासूनच्या १०० मीटर परिसरात तंबाखुजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही या वस्तुंची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, येत्या ऑलिंपिकमध्ये महाराष्ट्रातील जास्तीत जास्त खेळाडूंनी भाग घ्यावा यासाठी सर्वसमावेशक क्रीडा धोरण राबविण्याची आवश्यकता, जागतिक क्रमवारीमध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठांचा समावेश होण्याच्या दृष्टीने पुढील काळात संशोधनाला अधिकाधिक प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, प्रवेश नियंत्रण व शुल्क नियंत्रण अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कर्नाटक व इतर राज्यांच्या धर्तीवर नवा कायदा बनविण्याची आवश्यकता, राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्वरीत गर्व्हनिंग कौन्सिल नियुक्त करणे गरजेचे असणे, कौशल्य विकासाला जास्तीत जास्त चालना देण्यासाठी जिल्हा, तालुका व गट पातळीवर व्हीटीपी स्थापन करण्याची आवश्यकता, गड किल्ल्यांचे संवर्धन करुन महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपण्याची तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता, लोकसंख्येप्रमाणे नवीन वैद्यकीय महाविद्यालये

सुरू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव ) -**

**सर्वश्री. धनंजय मुंडे,** माणिकराव ठाकरे, सुनिल तटकरे, जयंत पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

"मागील चार महिन्यात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली भीषण परिस्थिती, पुरोगामी चळवळीतील अग्रणी नेते, श्रमीक, कष्टकरी व कामगारांचे नेते कॉ.गोविंद पानसरे व त्यांच्या पत्नीवर दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी कोल्हापूर येथे जीवघेणा हल्ला करण्यात येणे, या हल्ल्यात जखमी झाल्याने दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी त्यांचे मुंबईत निधन होणे, या घटनेला जवळपास १ महिना होऊनही आरोपींना पकडण्यात अपयश येणे, कॉ.पानसरे यांचेवरील हा हल्ला मागील वर्षीच्या कै.नरेंद्र दाभोळकर यांच्यावरील हल्ल्या सारखाच असणे, विशिष्ट विचारसरणीने त्यांच्यावर हल्ला केला असण्याचा संशय, पुरोगामी विचारसरणीच्या कार्यकर्त्यांना येत असलेल्या धमक्या, पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील कुमार रिसॉर्ट मध्ये सात वर्षीय बालिकेवर दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ वा त्यासुमारास बलात्कार करुन तिची करण्यात आलेली निर्घृण हत्या, यात आरोपींचा शोध न लावता घटनेचा निषेध करणाऱ्या नागरिकांवरच दाखल झालेले खुनाचे गुन्हे, बर्दापूर, गेवराई (जि.बीड) येथे महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या घटना, डोंबिवली (जि.ठाणे) येथे एका महिला पोलीस शिपायावरच बलात्कार करुन वर्षभर ब्लॅकमेलींग करण्यात आल्याची घटना, महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द लैंगिक शोषणाच्या तक्रारी करणे, त्यामुळे महिला वर्गात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, राज्यात खंडणी व हत्यांचे वाढलेले प्रमाण, दिनांक १० मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास नागपूरच्या व्यापाऱ्याची खंडणी न दिल्यामुळे झालेली हत्या, नगर जिल्ह्यातील दिपक कोलते या पोलिसाची तपासासाठी गेल्यावर झालेली हत्या, यातील आरोपींना मिळत असलेले राजकीय पाठबळ, ठाणे येथून भिवंडीकडे रिक्षाने जाणाऱ्या दोन मुलींचा रिक्षा चालकाने

केलेला विनयभंगाचा प्रयत्न, त्यातून त्यांनी स्वतःचा जीव वाचविण्यासाठी धावत्या रिक्षातून उडी मारणे, मुंबई, ठाणे, नागपूर परिसरात महिलांची मंगळसूत्रे व सोनसाखळ्या चोरीच्या वाढलेल्या घटना, मुंबई, ठाणे इतर महानगरात एम.डी.या नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या जीवघेण्या पावडरची खुलेआम विक्री होणे, या नशेमुळे आतापर्यंत १० व्यक्तींचा बळी जाणे, तरुण पिढी व विद्यार्थी वर्गात याच्या सेवनाचे प्रमाण वाढणे, मुंबईच्या मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनाच्या लॉकरमध्येच १२ किलो एम.डी. पावडर सापडणे, लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडून ब्लॅकमेलींग करण्याचे वाढलेले प्रकार, मुंबई शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, बार, पब्स २४ तास सुरू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याने याबाबत निर्णय झाल्यास मुंबईत निर्माण होणारा कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न, राज्यात वाळीत टाकण्याच्या प्रयत्नात झालेली वाढ, त्यामधील आरोपींना अद्यापही पकडण्यात आलेले नसणे, वाळूमाफीया राजरोसपणे पोलीस व प्रशासनातील अधिकाऱ्यांवर करीत असलेले हल्ले, नक्षलग्रस्त भागात वाढलेल्या कारवाया, गृह राज्यमंत्र्यांनीच माजलगांव (जि.बीड) येथे राजरोस भ्रष्टाचाराच्या प्रकरणाचे समर्थन करणे, राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास शासन पूर्णपणे अपयशी ठरणे, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेले भितीचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.**

"महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या टोल नाक्यांवरील पथकर कंत्राटदार मे.सोव्हेनिअर डेव्हलपर्स लि. धुळे यांनी केलेला गैरव्यवहार" या विषयावरील श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ११७६ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.**

"भारत संचार निगम लि. अलिबागच्या उपविभागीय कार्यालयाने चेंढरे ग्रामपंचायतीची (ता.अलिबाग, जि.रायगड) कराची रक्कम न भरल्याबाबत" या विषयावरील श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६६८ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ मार्च, २०१५.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.